**अ) कृती पूर्ण करा.** **(1)**

1) धरणीला जाळतो → ☐

2) मातीवरती न चिडणारी → ☐

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(2)**

1) निराश – आशा कवीला कोणाबद्दल वाटते?
2) 'सुखदुःखाची ऊनसावली' म्हणजे काय?

**क) तुमच्या मनाने उत्तर लिहा.** **(1)**

1) ढग दाटून येतात परंतु पाऊस पडत नाही, तेव्हा तुमच्या मनात कोणते विचार येतात?

**प्र 4 था अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(2)**
**(कोणतेही दोन)**

1) आजी नातवाला लवकर चल, म्हणून घाई का करीत होती?
2) अजय अस्वस्थ का झाला?
3) लेखिकेच्या बोटाला दुखापत कशी झाली?
दुखापत झाल्यावर लेखिकेने काय केले?
4) उजाडल्यामुळे निसर्गात कोणकोणत्या घटना घडतील, असे कवीला वाटले?

**प्र 4 था ब) का ते लिहा. (कोणतेही दोन)** **(2)**

1) लेखिकेला कपाळाला हात लावायची वेळ आली.
2) आजोबांची नात जोराने रडू लागली.
3) आजी शहरात गेली.
4) काळी माय ओसाड झाली.

**व्याकरण – विभाग**

**प्रश्न 5 वा अ) खालील वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखा.** **(1)**

| वाक्य | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|
| 1) तारा क्रिकेट खेळते. | | | |
| 2) यास्मीन पुस्तक वाचते. | | | |

**ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(1)**

1) धरणी = 2) लतिका =

**क) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**


1) उजवा X 2) दुर्लक्ष X

**ड) पुढील क्रियापदे सकर्मक की अकर्मक ते ओळखून लिहा.** **(1)**

1) आई भाकरी करते.

2) उद्या दिवाळी आहे.

**इ) बोट या शब्दावर आधारित वाक्यप्रचार व म्हणी लिहा. (1)**




**ई) खालील वाक्यांतील संयुक्त क्रियापदे ओळखून लिहा. (1)**

1) पालक मुलांसाठी सतत राबत असतात.

**उ) खालील वाक्यप्रचारांचा वाक्यांत उपयोग करा. (1)**
**(कोणतेही एक)**

1) मैदान गाजवणे.
2) कपाळावर आठ्या पसरणे.

**ऊ) खालील शब्दांना दायी शाली यांपैकी योग्य प्रत्यय लावून नवीन शब्द लिहा. (कोणतेही दोन)(1)**

1) गौरव – 2) आनंद –
3) आराम – 4) भाग्य –

**ए) पुढील सारणी पूर्ण करा. (4)**

| **काळ** | **सामान्य** | **अपूर्ण** | **पूर्ण** | **रीतीकाळ** |
|---|---|---|---|---|
| वर्तमान काळ | मधुबाला तबला वाजवते | | | मधुबाला तबला वाजवत असते. |
| भूतकाळ | | मधूबाला तबला वाजवत होती. | | |
| भविष्याकाळ | | | मधुबाला तबला वाजवत असेल. | |

**प्र 6 वा खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (4)**

1) मी मेट्रो बोलते आहे ––––
2) पहाट
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
4) माझी आई.

**प्र 7वा खालीलपैकी कोणत्याही एका पत्राचा नमुना तयार करा. (4)**

1) दिवाळीच्या सुट्टीत तुमच्या घरी बोलवण्यासाठी मैत्रिणीला पत्र लिहा.
किंवा
2) शैक्षणिक सहलीसाठी बसची चौकशी करणारे पत्र एस.टी. बस आगार व्यवस्थापक , नागपूर सेंट्रल यांना लिहा.

**प्र 8 वा खाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कथालेखन करा. व योग्य शिर्षक दया. (कोणतेही एक)(4)**

(मुद्दे : दोन प्रवासी – वामन व रामन – वाटेत सोन्याच्या नाण्यांची पटी – दोघांनाही पैशांची हाव – एकाने जेवणात विष मिसळणे – दुसऱ्याने त्याला मारणे –– दोघांचाही नाश. )

किंवा

(मुद्दे : शेतकरी – घरासमोर सीताफळाचे झाड – शेतकऱ्याने जमीनदाराला फळे देणे – जमीनदाराला हाव – सीताफळाचे झाड उपटून नेणे – झाड मरणे.)

***